# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. ३४१०/२०२१/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री बाबासाहेब बबन कांबळे मु. पो. धामोडे, ता. येवला, जि. नाशिक | उप अभियंता (इवद), जिल्हा परिषद उप विभाग, येवला, ता. येवला, जि. नाशिक | कार्यकारी अभियंता (इवद), विभाग क्रमांक २, जिल्हा परिषद नाशिक, ता. जि. नाशिक |

सुनावणी दिनांक — २७/१०/२०२३

१२. उपस्थिती —

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

१३. द्वितीय अपील अर्ज —

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०९/११/२०२१

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती मिळाली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही

१४. माहिती अर्ज —

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १४/०७/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : २०/११/२०१८

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती** : धामोडे ता. येवला येथील दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत झालेल्या सीमेंट कांक्रिट रास्ता निकृष्ट कामाची राज्य गुणवत्ता निरीक्षक औरंगाबाद मार्फत वस्तुस्थिती पाहणी झालेली आहे त्यांच्या अहवालाची झेरॉक्स प्रत

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (इवद), जिल्हा परिषद उप विभाग, येवला यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

१५. प्रथम अपील -

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २४/८/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती अप्राप्त

(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इवद), विभाग क्रमांक २, जिल्हा परिषद नाशिक यांनी प्रथम अपीलाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

१६. युक्तिवाद/लेखी खुलासा —

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अपीलार्थी यांचे दिनांक १८/९/२०२३ चे लेखी निवेदन सादर केले असून त्यामध्ये अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी मला माहिती दिलेली असल्याने माझा अर्ज निकाली काढावा असे नमूद केलेले आहे.

४) निष्कर्ष —

अपीलार्थी यांनी दिलेल्या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

आदेश

प्रस्तुतचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक ३१-३२६४ 30 OCT 2024